दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ३२ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.१९ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## प्रकल्प अधिकाऱ्यांनी रोखली तब्बल २१६ शिक्षकांची पगारवाढ

### आश्रम शाळेतील शिक्षकांमध्ये खळबळ

**गडचिरोली । प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,अहेरी अंतर्गत समाविष्ट शासकीय तथा अनुदानित आश्रम शाळेतील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक असे तब्बल २१६ शिक्षकांचे वार्षिक पगारवाढ थांबविल्याने शिक्षकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,अहेरी अंतर्गत येत असलेल्या शासकीय आश्रम शाळेतील ६७ आणि अनुदानित आश्रम शाळेतील १४९ शिक्षकांचा यात समावेश असून ६५ शिक्षकांची तीन वर्षांकरिता,१३८ शिक्षकांची दोन वार्षकरिता आणि १३ शिक्षकांची वेतनवाढ एक वर्षाकरिता असे तब्बल २१६ शिक्षकांचे पगारवाढ अहेरीचे प्रकल्प अधिकारी वैभव वाघमारे यांनी रोखली आहे.अहेरी प्रकल्पात ११ शासकीय आणि १५ अनुदानित असे एकूण २६ आश्रम शाळेतून हजारो आदिवासी विध्यार्थी निवासी स्वरूपात राहून शिक्षण घेतात.मात्र,येथील बहुतांश विद्यार्थ्यांना मराठी उतारा वाचता न येणे,बेरीज, वजाबाकी करता न येणे,गणितातील मूलभूत क्रिया न येणे,प्रथम भाषा वाचता न येणे एकूणच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता खालावल्याचा ठपका ठेवत प्रकल्प अधिकारी वैभव वाघमारे यांनी




प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचे वार्षिक पगारवाढ रोखले आहे. ही परीस्थिती केवळ प्राथमिक आणि माध्यमिक मध्येच नसून उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांमध्ये देखील आढळून आल्याने आश्रम शाळेच्या शिक्षण प्रणालीवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे.विशेष म्हणजे एवढया मोठ्या संख्येने शिक्षकांवर पगारवाढ रोखण्याची ही पहिली घटना असून याची सर्वत्र चर्चा सुरू आहे. त्यामुळे आश्रम शाळेच्या शिक्षकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

**अन्यथा होणार प्रशासकीय कारवाई**

**आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना मूलभूत कौशल्य आत्मसात होणे गरजेचे आहे.त्यांना संख्या ज्ञान,वाचन,लेखन, बेरीज,वजाबाकी, गुणाकार,भागाकार करता आला पाहिजे. या सोबतच आदी बाबींकडे विशेष लक्ष देऊन येत्या ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत किमान ७० टक्के विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक बदल घडवून आणणे अनिवार्य आहे.सदर कारवाई किरकोड स्वरूपाची असून दिलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ न झाल्यास शिक्षकांना प्रशासकीय कारवाईला सामोरे जावे लागेल असा ईशारा अहेरीचे प्रकल्प अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिला आहे.**

## कंत्राटी कामगारांना शास्वत रोजगारांची हमी द्या

### तांत्रिक ॲप्रेंटीस कंत्राटी कामगार असोसिएशनची मागणी



**नागपुर । प्रतिनिधी**

विज क्षेत्रातील कत्राटी कामगाराचे ज्वलत प्रश्न अनेक वर्षापासुन प्रलंबित आहेत संघटनेने अनेक आदोलनाच्या माध्यमातुन प्रलंबित प्रश्नाला वाचा फोडली आहे. राज्याचे उर्जामंत्री व तिन्ही कंपनीच्या मुख्य प्रशासना समवेत कत्राटी कामगाराना कायम सेवेत सामावुन घेण्याकरीता शासन सकारात्क घोरण आखेल तसेच कत्राटी कामगाराना शास्वत रोजगारांची हमी देणार, सरळ सेवा भरती मध्ये प्राधान्य देणार व ईतर अशा स्वरूपाची घोषणा करण्यात आल्या होत्या त्यानुसार कार्यवाही करावी अशी मागणी तांत्रिक ॲप्रेंटीस कंत्राटी कामगार असोसिएशने राज्याचे उर्जामंत्री ना. देवेंद्र फडणवीस याच्या कडे निवदेना व्दारे केली असल्याची माहीती राज्य कार्याध्यक्ष विक्की कावळे यांनी प्रसिध्द केलेल्या पत्रकात दिली आहे.


कंत्राटी कामगारांना ईतर राज्याप्रमाणे नियमित सेवेत कायम करण्यात यावे, कत्राटी कामगारांना रोजदारी पध्दतीने कामावर घेवुन शाश्वत रोजगारांची हमी दयावी, कत्राटी कामगारांना सरळ सेवा भरती मध्ये आरक्षण देण्यात यावे. तिन्ही कंपनीतील कंत्राटी कामगाराकरीता कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात यावी, महावितरण, महानिर्मीती, महापारेषण कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवारी पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थी करीता तिन्ही कंपनीमध्ये चुतुर्थ श्रेणीतील सरळ सेवा भरती मध्ये १०० टक्के आरक्षण देण्यात यावे. शासनाने सरळ सेवा भरती करीता वयोमर्यादेमध्ये वाढ केली आहे. परंतु महावितरण कंपनीमध्ये अद्याप या बाबत काहीच कार्यवाही केली नाही. सरळ सेवा भरती प्रकीयमध्ये वयोमर्यादा मध्ये वाढ करण्यात यावी, तिन्ही कंपनीतील कंत्राटी कामगारांनाकडुन कंत्राटदार गासिक वेतनामधुन ४ हजार ते ६ हजार रुपयाची मागणी केली जाते. पैसे परत न केल्यास त्याना कामावरून कमी केल्या जात आहे. नियमाप्रमाणे वेतन फक्त कागदोपत्रीच दाखविल्या जाते. प्रत्येक्षात मात्र कत्राटी कामगारांची आर्थीक पिळवणुक करण्यात येते. उदा अकोला , नादेड , वाशीम ,सातारा ,महानिर्मीती पोफळी,महानिर्मीती उजणी,कंत्राटदार बदल्यानतर कत्राटी कामगारांना परत कामावर घेण्यासाठी कंत्राटदाराकडुन पैसे ची मागणी, मानसिक छळ केला जातो. तसेच संपर्क पोर्टल मध्ये कंत्राटी कामगाराची माहीती अपलोड केलेली असते विनाकारण कंत्राटी कामगाराकडुन कागदपत्राची मागणी करण्यात येवु नये, पुर्वीप्रमाणे रिक्त कामगारांच्या संख्येच्या ९५ टक्के कंत्राटी कामगार भरती करण्यात यावी, कर्मचारी राज्य विमा महामंडळ च्या सुविधा प्रत्येक कत्राटी कामगारा पर्यंत पोहचविण्याकरीता कार्यवाही करावी आदी, महापारेषण कंपनीमध्ये वायरमन आयटीआय धारकांना सरळ सेवा भरती मध्ये संधी द्यावी. प्रलंबित प्रश्नामुळे कंत्राटी कामगारामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे दिलेल्या आश्वासनानुसार कंत्राटी कामगाराचे प्रश्न सोडविण्यात यावे अशी मागणी राज्याचे उर्जामंत्री ना. दवेंद्र फडणवीस यांच्या कडे केली असल्याची माहीती तांत्रिक ॲप्रेंटीस कंत्राटी कामगार असोसिएशनचे राज्याध्यक्ष प्रभाकर लहाने,राज्य कार्याध्यक्ष विक्की कावळे, सरचिटणीस शेख राहील, अतुल पाटील, प्रताप खंदारे, प्रमोद भालेराव, गजानन अघम यांनी केली आहे

## जिल्ह्यात बालविवाह मुक्त भारत अभियान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत जिल्ह्याकरीता रुरल अँड अर्बन डेव्हलपमेंट युथ असोसिएशन (रुदय) गडचिरोली यांच्या असेस टु जस्टिस प्रकल्प च्या माध्यमातून जिल्हयातील ४ तालुक्यांतर्गत प्रत्येक गावात जनजागृतीपर कार्यक्रम तथा कॅन्डल मार्च रॅली काढून शाळांमध्ये जनजागृती करण्यात आली.

जिल्हाधिकारी विनय गौडा व महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चंद्रपूर यांच्या सहयोगातून संपूर्ण जिल्ह्यात जनजागृतीपर कार्यक्रम राबविणे यशस्वी झाले आहे. भारतात ३०० पेक्षा जास्त जिल्ह्यात हे अभियान चालविले जात असून २०३० पर्यंत बालविवाह मुक्त भारत करण्यासाठी समाजातील महिला व बालकांच्या नेतृत्वात हे अभियान पुढे जात आहे. या अभियानाशी संलग्न देशातील १६० अशासकीय संघटना या अभियानास सढळ हाताने मदत करीत आहे. ज्यामुळे समाजात असलेल्या कु-प्रथा यांचा समुच्चय नायनाट करण्यासाठी सर्वसामान्य जनतेकडून शपथ घेण्यात



आली. सामाजिक कार्यक्रम व मार्गदर्शनाच्या माध्यमातून कॅन्डल मार्च व रॅलीच्या रूपाने घोषवाक्य व बालगीताच्या जल्लोषाव्दारे सदर कार्यक्रम जिल्हयातील चार तालुक्यात पार पाडण्यात आला.कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर व रुदय संस्थेचे सचिव काशीनाथ देवगडे यांच्या मार्गदर्शनातून बाल विवाह मुक्त दिवस पार पाडला. यावेळी प्रकल्प व्यवस्थापक नरेश मॅकलवार, बाल तस्करी समन्वयक रीना गर्णावर, समुपदेशिका राणी मेश्राम, क्षेत्रीय अधिकारी शशिकांत मोकाशे, पुनम साळवे, विद्या मोरे, सोनम लाडे आदी उपस्थित होते.

## शिवसेना (उबाठा) मदतीने मिळाले विद्युत ट्रान्सफॉर्मर

### शेतकऱ्यांनी जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांचे मानले आभार

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील बोडखा मोकाशी येथील शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत ट्रान्सफॉर्मर खराब झाले होते. महावितरण कार्यालयात ट्रान्सफॉर्मर उपलब्ध नसल्याने शेतीच्या हंगामात शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागत होता. मात्र शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे यांच्या सहकार्याने शेतकऱ्यांना विद्युत ट्रान्सफॉर्मर उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले.

तालुक्यातील बोडखा मोकाशी येथील शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत ट्रान्सफॉर्मर खराब झाल्याने त्यांनी खांबाडा येथील महावितरण कार्यालय येथे धाव घेतली होती. त्याठिकाणी ट्रान्सफॉर्मर उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांनी शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्याशी शिवसेना विधानसभा मीडिया प्रमुख गणेश चिडे यांच्या सहकार्याने संपर्क साधला. जिल्हा प्रमुख मुकेश जिवतोडे यांनी तत्काळ महावितरणचे



मुख्यअभियंता यांच्याशी संपर्क साधुन शेतकऱ्यांच्या शेतात ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून द्या अशी मागणी केली होती. याचीच दाखल घेऊन महावितरण अधिकाऱ्यांनी चंद्रपूर वरून विद्युत ट्रान्सफॉर्मर मागणी करून १०० व्हॅट चे विद्युत ट्रान्सफर बोडखा मोकाशी येथील शेतकऱ्यांच्या शेतात लावण्यात आले. त्यामुळे येथील ग्रामपंचायत सदस्य रुपेश तुराळे, राजेंद्र तुराळे, देविदास हुलके, विठ्ठल बरडे, केशव बलखंडे, पुणेश्वर तुराळे, सचिन चिडे,संजय सराटे,महादेव तुराळे, तुळशीराम तुराळे व शेतकऱ्यांनी शिवसेना जिल्हा प्रमुख मुकेश जिवतोडे यांचे आभार व्यक्त केले.सध्या शेतीचे हंगाम असल्याने शेतकरी शेतात ओलीत करतात त्यामुळे शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान न व्हावे यासाठी वरोरा येथील महावितरण कार्यालयात तात्काळ विद्युत ट्रान्सफॉर्मर जास्तीत जास्त उपलब्ध करून ठेवावी अशी मागणी शिवसेना जिल्हा प्रमुख मुकेश जिवतोडे यांनी विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना केली आहे.

## विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते होणार महाकाली महोत्सवाचे उद्घाटन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्री महाकाली माता महोत्सव समितिच्या वतीने आयोजित पाच दिवसीय श्री माता महाकाली महोत्सवाचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते गुरुवारी सकाळी ९ वाजता उद्घाटन करण्यात येणार आहे. सदर महोत्सवासाठी ते सकाळीच चंद्रपूरात दाखल होणार असल्याची माहिती महाकाली महोत्सव समितीचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी दिली आहे.

या महोत्सवात विविध सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ वाजता जैन मंदिर संस्था सराफा असोशिएशनच्या वतीने जैन मंदिर येथून श्री माता महाकालीच्या चांदीच्या मुर्तीची शोभायात्रा काढण्यात येणार आहे. सदर शोभायात्रा जैन मदीर,गांधी चौक होत आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी दाखल होणार आहे. येथून गिरणार चौक



मार्गे शोभायात्रा महाकाली मंदिर येथील पटांगणात आयोजित श्री माता महाकाली महोत्सवच्या पेंडालात पोहचणार आहे. त्यांनतर पेंडालात श्री माता महाकाली मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

त्यांनतर महाआरतीने महोत्सवाला सुरुवात होणार आहे. या महोत्सवाच्या उद्घाटनासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर चंद्रपूर दौऱ्यावर असून त्यांच्या हस्ते सदर महोत्सवाचे उद्घाटन केल्या जाणार आहे. नंतर मान्यवरांच्या हस्ते नवरात्रोदरम्यान जन्मास आलेल्या कन्यांना चांदिचे नाणे देण्यात येणार आहे. दुपारी १२ ते १ वाजता महिला सुरक्षा या विषयावर अतिरिक्त पोलिस अधिकारी रिना जनबंधू यांच्या मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १ वाजता श्रीमद् भागवत प्रवक्ता, प्रवचन किर्तनकार सरोज चांदेकर यांचे संगीतमय प्रवचन कार्यक्रम पार पडणार आहे. दुपारी २.३० मी. वाजता शहरातील शाळेंचे विद्यार्थी धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक विषयांवर समुह नृत्य सादर करणार आहे. सायंकाळी पाच वाजता श्री माता महाकाली जागरण गृपच्या वतीने माता महाकाली आरती व भजन गायल्या जाणार आहे. सहा वाजता नृत्य जल्लोष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर रात्री ८ वाजता जगप्रसिध्द देवी गीत जागरणकार लखबीर सिंग लक्खा यांचा कार्यक्रम पार पडणार आहे. सर्व माता भक्तांनी या कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहण श्री महाकाली माता समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या सूचित समाविष्ट असलेल्या जातींना राष्ट्रीय सूचित समाविष्ट करण्यासाठी जलद शिफारस करावी-हंसराज अहिर

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरक्षण सूचीमध्ये समाविष्ट होण्यासाठी ज्या जातींनी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे शिफारस केली आहे, अशा जातींच्या कागदपत्रांची पूर्तता करून अहवाल राष्ट्रीय आयोगाकडे सादर करावा. तसेच, नव्याने आलेल्या अर्जासंदर्भातील शैक्षणिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करून शिफारस तातडीने राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाकडे पाठविण्यात यावी, अशा सूचना राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे राष्ट्रीय सूचित समाविष्ट होण्यासाठी ज्या जातींचे अर्ज प्रलंबित आहेत, त्या अर्जाबाबत सुनावणी घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते.अहिर म्हणाले की, लोधी, बडगुजर, वीरशैव लिंगायत, सलमानी, भोयर पवार, सुर्यवंशी गुर्जर, बेलदर, झाडे, डांगरी व कलवार, शेगर-धनगर व इतर ओबीसी जातींचा राज्य मागास यादीत समावेशाबाबत कागदपत्रांची पूर्तता करून राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाकडे १५ दिवसांत यादी पाठविण्यात यावी. तसेव, नव्याने आलेल्या शिफारशींवर सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या परिस्थिती आणि अडचणी तपासाव्यात. ही कार्यवाही जलदगतीने करण्यासंदर्भात त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे सदस्य भुवन भूषण कमल, सचिव राजीव रंजन, सल्लागार राजेश कुमार, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य माजी न्यायमूर्ती चंद्रलाल मेश्राम, ङ बी.एल. सगर किल्लीकर, सदस्य सचिव श्रीमती आशाराणी पाटील, आमदार कीर्तीकुमार



उर्फ बंटी भांगडीया, माजी आमदार संजय धोटे, माजी आमदार आशिष देशमुख, संजयजी गाते अध्यक्ष भाजपा ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव विरेंद्र सिंग, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे संचालक डॉ. प्रवीण देवरे यांचे सह विविध जाती समुहाचे प्रतिनिधी उपस्थित होते.भोयर, पवार समाजाचे (पवार मिशन ) चे प्रतिनिधी, रावण फरकाडे,अध्यक्ष युवा भोयर, पवार मंच,भगवान बन्नगरे,अध्यक्ष भोयर, पवार विध्यार्थी मंडळ,. सरिता गाखरे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, मधुकर चोपडे महामंत्री, मोरेश्वर भादे, सचिव अखिल भारतीय भोयर, पवार महासंघ, सुरेश देशमुख, सरंक्षक युवा भोयर, पवार मंच, बंडु पराडकर सचिव, भोयर, पवार विद्यार्थी मंडळ, श्विजय गाखरे अध्यक्ष जनजागृती एकता मंच,उपस्थित होते.पवार मिशन चे सर्व सदस्य यांनी अतुल सावे मंत्री इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री महाराष्ट्र शासन यांची भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली.

# साहेब, थुंकायचं कुठे?

**शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन प्रयत्न करते. परंतु त्यात नागरिकांचा पुरेसा सहभाग नसल्याने शासनाच्या अनेक योजना फसतात. त्यासाठी प्रशासनाने नागरिकांमध्ये रंजन, मनोरंजनाच्या माध्यमातून लोकजागृती घडवून आणली व नागरिकांना महत्व समजावून सांगितले तर शासनाच्या योजना फलद्रूप झाल्याशिवाय राहणार नाही. पण त्यासाठी प्रशासनाची इच्छाशक्ती जागृत झाली पाहिजे.**




शहर सुंदर आणि स्वच्छ दिसण्यासाठी नगरपालिका प्रशासनातर्फे विविध उपायोजना केल्या जातात.नागरिकांना स्वच्छतेचे महत्व समजावून सांगितले जाते. बऱ्याचदा प्रेमाने सांगून नागरिक ऐकत नाही तेव्हा त्यांना कायद्याचा बडगा दाखवून, प्रसंगी धमकी देऊनही प्रशासनाला लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करावी लागते. स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी स्वच्छता विषयक वातावरण निर्मिती करावी लागते.नागरिकांचे आरोग्य लक्षात घेता पालिकेतर्फे राबविण्यात येणारे हे उपक्रम अतिशय महत्त्वपूर्ण आहे

परंतु नागरिक पालिकेची भूमिका कितीही लोककल्याणकारी व लोकोपयोगी असली तरी समजून घेत नाही. पालिकेच्या नियमांना हेतूपुरस्सर बगल देण्याचा काही नागरिक प्रयत्न करतात. पालिका प्रशासन सार्वजनिक ठिकाणी लिहितात .येथे थंकू नये. थूकल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. परंतु काही नागरिक नेमके तिथेच थुंकतात. जणू काही हट्टाने पेटल्याप्रमाणे प्रतिबंधित जागेवर थुंकण्यामध्ये त्यांना मोठा अभिमान वाटत असावा? अशाप्रसंगी पालिका काय करणार? आपल्याकडे बऱ्याचदा ज्या गोष्टीची मनाई केली जाते. त्याविरोधात काही विघ्नसंतोषी व लापरवाह नागरिक त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतात. जिथे थुंकू नका म्हटले नेमके तिथेच थुंकतील. जिथे लघवी करू नका म्हटले तिथेच करतील. जिथे कचरा टाकू नका म्हटले तिथेच कचरा टाकतील. नेमके ते असे वागतात? अशा या काही मोजक्या नागरिकांमुळे पालिका प्रशासन आपले इच्छित ध्येय साध्य करू शकत नाही. ज्याप्रमाणे पालिका आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न करते. तेव्हा नागरिकांनीही आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे निभावून घेतली पाहिजे. पालिका आणि नागरिक उभयतांनी परस्पर आपापली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या तर शहर स्वच्छतेच्या बाबतीमध्ये नावलौकिक निश्चितच कमवेल याबाबत शंका नाही.महाराष्ट्र शासनाने नागरिकांमध्ये स्वच्छतेच्या बाबतीत जागरूकता निर्माण करण्यासाठी स्वच्छता अभियान राबवून त्यात सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्यांसाठी पुरस्कार घोषित केलेले आहे. खरे म्हणजे हे पुरस्कार नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी असतात. नागरिक हे समजून का घेत नाही? थोडासा मनावर आवर घातल्यामुळे जर शहर स्वच्छ राहत असेल तर ते करायला नागरिक मागेपुढे का बघतात. खर म्हणजे स्वच्छता हा आपल्या जीवनशैलीचा भाग असला पाहिजे. कोविड संसर्गजन्य आजार काळात आपल्याला स्वच्छतेचे महत्व समजून सांगितले जात होते.वारंवार हात धुवा असे शासन आणि प्रशासन ओरडून ओरडून सांगत होते. ज्या देशांमध्ये शासनाला नागरिकांनी हात कसे धुवावे हे सांगावे लागतं असेल. तेथील नागरिक किती प्रगतशील असतील याचा विचार केलेला बरा. शासन सांगो अथवा न सांगो आपण आपल्या व्यक्तिगतरित्या स्वच्छता प्रामाणिकपणे जोपासली पाहिजे. कारण स्वच्छतेचा संबंध आपल्या आरोग्याची आहे. आपला परिसर स्वच्छ, आपले शरीर स्वच्छ, आपलं मन स्वच्छ असेल तर संसर्गजन्य रोग नियंत्रणात राहतील. आपल्यापर्यंत पोहोचू शकणार नाही. एकदा आजारी पडल्यानंतर दवाखान्यात जाऊन ईलाज करण्यापेक्षा, आर्थिक भुर्दंड सोसण्यापेक्षा आजारी पडूच नये यासाठी स्वच्छता पाळली पाहिजे. पावसाळ्यात घराशेजारील कचरा काढून टाकला पाहिजे. घरामध्ये मच्छरांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून खिडक्यांना जाळ्या लावल्या पाहिजे.परीसर स्वच्छ ठेवला पाहिजे. सरकार सांगेल आणि मी करीन असे न वागता स्वयं प्रेरणेने स्वच्छतेचे महत्व समजून वर्तनात आणले पाहिजे.असे अनेक उपाय करून आपल्याला आपले आरोग्य सुंदर व निरोगी ठेवता येईल. काही बाबतीत केवळ नागरिकांना दोष देऊन जमणार नाही. अनेकदा प्रशासनाचेही काही प्रमाणामध्ये चुकते. लोक वाटेल तिथे का थुंकतात. थुंकी ही दीर्घकाळ रोखून ठेवायची बाब नाही. जेव्हा थुंकायचे असते तेव्हा थुंकावेच लागते. जशा इथे थुंकू नये अशा प्रशासन पाट्या लावते. तशाच काही मोजक्या जागा निर्धारित करून इथे थुंका अशाही पाट्या लावायला पाहिजे.परंतु आपल्याकडे लोकांना जेव्हा थुंकायचं असते तेव्हा कुठे थुंकावे अशा जागा उपलब्ध नसतात. आपल्याकडे काही ठिकाणी इथे कचरा टाकू नये अशा सूचना असलेली फलके लावतो. तशाच काही येथे कचरा टाका अशा पाट्या लावून या ठिकाणी कचरा टाकायला हरकत नाही असे सुचवतो.तशीच थुंकायसाठी जागा निर्धारित करायला पाहिजे. तुम्ही इथे थुंकू शकता, तुम्ही येथे कचरा टाकू शकता असे निर्धारित ठिकाणी लिहायला हरकत नाही.असे जर झाले तर नागरिक ठरलेल्या ठिकाणीच थुंकतील आणि ठरलेल्या ठिकाणीच कचरा टाकतील. फ्रान्समधील नागरीक रस्त्यावर कचरा टाकत नाही. ते आपल्या सोबत एक छोटीशी पिशवी ठेवतात. त्या थैलीमध्ये कचरा साठवून ठेवतात आणि संध्याकाळी ठरलेल्या ठिकाणीच कचरापेटीमध्ये कचरा टाकतात. आपल्याकडे असे होत नाही. एकतर आपल्या नागरिकांना तशी स्वयंशिस्त पाळण्याची सवय नाही. दुसरे म्हणजे आपण स्वच्छतेबद्दल तितकेसे प्रामाणिक नाही. त्यासाठी पालिका प्रशासनाने प्रत्येकांमध्ये स्वच्छतेचा संदर्भात जागरूकता निर्माण होईल यासाठी जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक आहे. लोकप्रबोधन करणे आवश्यक आहे. रंजन, मनोरंजन यातून हे पटवून देणे सहज शक्य आहे. ज्या दिवशी नागरिकांना हे मनापासून कळेल तेव्हा ते प्रामाणिकपणे शासनाच्या उपक्रमात सहभागी झाल्याशिवाय राहणार नाही. पण त्यासाठी प्रशासनानेही आपली मरगळ झटकून समोर यायला पाहिजे. आपली जबाबदारी समजून वागायला पाहिजे.



# भारताची मैत्रीपूरक तटस्थता

चीनच्या साम्राज्यवादाला शह देण्यासाठी भारताने समविचारी देशांची मोट बांधली आहे. हिंद-प्रशांत क्षेत्रातील ज्या छोट्या देशांना चीन धमकावत आहे, त्यांनीही भारताशी मैत्र साधले आहे. आपली तटस्थता कैक मैत्रीचे पूल बांधू शकते, हे दिसून येत आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कारकीर्दीचे एक दशक आणखी सहा-सात महिन्यांत पूर्ण होईल. या दशकाचा उत्तरार्ध २०१७ मध्ये सुरू झाला. डोकलाम, गलवान आणि यांगन्से या ठिकाणी भारताच्या सैन्याने चीनला काटशह दिला, जपान-ऑस्ट्रेलिया व अमेरिका या देशांबरोबर आपण चतुष्कोनी आकृतिबंध उभा केला. चीनबाबतीत 'शठं प्रति शाठ्यं', असे कणखर धोरण अंमलात आणले.म्हणजेच तटस्थता राखणे हे आमचे साध्य नाही, तर भारताचे सार्वभौमत्व कायम राखणे, सरहद्दींची राखण करणे हे साध्य, तर तटस्थता साधन आहे. असा संदेशच आपण दिला आहे. अर्थात हे साधनही कोणत्याच लष्करी गटात सामील व्हायचे नाही आणि पुरेशी लवचिकता राखून अमेरिकेशी दोस्ती करतांनाच रशियाशीही दुश्मनी वाढवायची नाही, असे बंधन आपल्यावर लादते. म्हणजेच नैतिकता, सिद्धांतशरणता यांचे देव्हारे माजवायचे नाहीत, हे सूत्रही नक्की होते.आश्चर्य म्हणजे खुद्द चीनने उभ्या केलेल्या वेगवेगळ्या आघाड्यांतही आपण सहभागी आहोत. 'ब्रिक्स' आघाडी उभारण्यात पुढाकार चीनचाच होता. यावर्षी झालेल्या या आघाडीच्या जोहान्सबर्गमधील बैठकीत अर्जेंटिना, इजिप्त, इथिओपिया, इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या सहा देशांना सामावून घेतले. अन्य अल्पविकसित देशही आघाडीत सदस्यत्वासाठी उतावीळ आहेत.कारण भले अमेरिका आम्हांस प्रिय असेल; पण आमच्या हितसंबंधांची जपणूक आम्हीच केली पाहिजे, ही त्यांची भूमिका आहे. अर्थात इराण सरळसरळ अमेरिकेविरोधात आहे. तात्पर्य, चीनची महत्वाकांक्षा अमेरिकाविरोधी फळी उभी करण्याची असेल, पण वर्तमानात 'ब्रिक्स' आघाडीचे अकरा सदस्य अल्पविकसित देशांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यास प्राधान्य देणारे, भारताच्या धोरणाची तळी उचलणारे आहेत.शांघाय सहकार्य परिषद (एससीओ) ही आघाडी १९९६ मध्ये जन्माला आली, ती रशिया व चीन यांच्या पुढाकारातून! प्रारंभी या दोघांनी मध्य आशियातल्या कझाकिस्तान, किरगिझस्तान आणि ताजिकिस्तान या तीन देशांनाच सदस्यत्व दिले. या वर्षी भारतात या परिषदेच्या संरक्षण आणि परराष्ट्र मंत्र्यांची बैठक झाली. भारत या परिषदेचा २०१७मध्ये पूर्ण सदस्य झाला.त्याचवर्षी भूतानजवळ डोकलामला आपल्या सैनिकांनी चिनी जवानांना पुढे येण्यापासून अटकाव केला. म्हणता म्हणता या परिषदेतल्या पूर्ण सदस्यदेशांची संख्या आठ झाली. निरीक्षक सदस्यांची संख्या चार, तर आणखी सहा देशांची वर्णी संवादी सदस्य म्हणून लागली. भारताने या परिषेदत पदार्पण केले तेव्हाच कळून चुकले की, रशिया आणि चीन या संस्थापक सदस्यांमध्येच अंतर्गत स्पर्धा आहे.रशियाला चीनच्या महत्वाकांक्षेला वेसण घालण्यासाठी भारताच्या सहकार्याची गरज आहे. भारतालाही मध्य आशियातल्या पाचही नेमस्त मुस्लिम देशांशी जवळीक हवी आहेच. सारांश, भारताची तटस्थ नीती आता दुर्बल नाही. सध्या आपण चीनबरोबर 'जशास तसे' धोरण पत्करले आहे. चांद्रयान चंद्रावर उतरविण्यात आपण यशस्वी झालो.जगातल्या कोणत्याही देशाला कर्जाच्या विळख्यात अडकवून तिथे स्वत:ची वसाहत उभी करण्याची आपली इच्छा नाही. परिणामतः वर्तमानातली भारताची तटस्थता कैक देशांशी मित्रता करण्यात सफल ठरली आहे.हिंद-प्रशांत क्षेत्रात आपण वर म्हटल्याप्रमाणे चतुष्कोनी आकृतिबंध उभा करून भारताने चीनला शह दिला आहे; तर युरेशियात चीन आणि रशिया यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या दोन आघाड्यातही प्रवेश करून भारताच्या हितसंबंधांची राखण करण्याची खटपट चालविली आहे. २०२३मध्येच आग्नेय आशियाई देशांची परिषद हिंद-प्रशांत क्षेत्रात जाकार्ताला इंडोनेशियाचे अध्यक्ष जोको विदोदो यांनी योजिली आणि भारताच्या या परिषदेशी जुळलेल्या नातेसंबंधांना अत्यंत पूरक कृती करून सुखद धक्का दिला.जोको विदोदो यांनी हिंद-प्रशांत क्षेत्राशीच आग्नेय आशिया संलग्न आहे हे तर जाहीर केलेच; पण दक्षिण चीन समुद्रात सर्व आंतरराष्ट्रीय विधिनिषेधांना धुडकावून बीजिंगचीच निरंकुश सत्ता या जलाशयात रुजावी या हेतूने कटकारस्थाने करणाऱ्या चीनलाच आव्हानही दिले. परिणामतः भारताला तर दिलासा मिळालाच, पण जपान, फिलिपिन्स, व्हिएतनाम, मलेशिया आणि दस्तुरखुद्द इंडोनेशिया अशा राष्ट्रांना ऐतिहासिक बळ लाभले.मोदी कारकीर्दीच्या उत्तरार्धात हळूहळू चीनच्या साम्राज्यवादाला लगाम लावण्याचे प्रयत्न आग्नेय अशियात मूळ धरत आहेत. भारताच्या तटस्थ परराष्ट्र धोरणाला जगातले सर्व महासागर भयमुक्त व निर्विघ्न संचारासाठी खुले झालेले पाहायचे आहेत. चीनच्या साम्राज्यलालसेने चीनला खेटून असलेले तैवान, व्हिएतनाम, फिलिपिन्स वगैरे देशांच्या सार्वभौमत्वावर घाला आला आहे.या अर्थाने हे देश जात्यात, तर कंबोडिया, थायलंड, इंडोनेशिया वगैरे आग्नेय आशियाई देश सुपात आहेत. त्यामुळे आजच संघटित होऊन चीनच्या संकटापासून मुक्त राहिले पाहिजे, ही भावना आग्नेय आशियात आहे. भारताने या देशांशी मैत्री वाढवून चीनच्या कूटनीतीला शह दिला आहे. भारताने भयग्रस्त व्हिएतनाम, फिलिपिन्स व तैवान यांच्याशी मैत्रीचे सेतू बांधले आहेत. सारांश, प्रथमच आपण चीनच्या प्रभाव क्षेत्रात घुसून चीनविरोधात मोर्चे बांधले आहेत.इंडोनेशियाने आग्नेय आशियाई देशांना हिंद-प्रशांत क्षेत्राकडे वळविण्यात व चीनसंदर्भात तटरक्षक भिंत बांधण्यात पुढाकार घेतला, तसाच उत्साह दक्षिण कोरियानेही दर्शविला आहे. या दोघांनी स्वतःहून भारतालाच सहकार्य देऊ केले आहे. चीनने भूपृष्ठीय व सागरी मार्गांची जाळी विणून अवघ्या जगाला स्वतःच्या दावणीस बांधण्याचा कट रचला आहे; तेव्हा याही बाबतीत भारताने दोन महत्त्वाचे कॉरिडॉर सांधण्याची खटपट चालविली आहे.थेट मध्यपूर्व आणि युरोप या भूभागाशी यामुळे संधान साधणे शक्य होणार आहे. पैकी एक कॉरिडॉर सौदी अरेबिया, जॉर्डन आणि इस्त्रायल यांच्या मार्गे पुढे युरोपात, म्हणजे इटली, फ्रान्स देशांशी व्यापारउदीम तसेच संरक्षणविषयक करार करण्यास भारताला साह्यभूत ठरेल. काही दिवसांपूर्वीच दहशतवादी संघटना 'हमास'ने इस्त्रायलवर हल्ले चढविले, तेव्हा इस्त्रायल, भारत आणि सौदी अरेबिया यांच्यातील मैत्रीलाच सुरुंग लावण्याचा 'हमास'चा हेतू उघड झाला आहे.भारतानेच मध्यंतरी 'आय् टू, यू टू' या मथळ्याची एक आघाडी उभी करण्यात उत्साह दाखविला आहे. 'आय' म्हणजे इंडिया आणि इस्राईल; तर 'यू' म्हणजे अमेरिका आणि संयुक्त अरब अमिराती या दोन देशांना सूचित करते. या सगळ्यांची मोट बांधण्यात भारताने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतानेच उत्तर दक्षिण दिशांना सांधणारा आणखी एक कॉरिडॉर बांधण्याचा मनसुबा ठेवला आहे. हा कॉरिडॉर न्हावाशेवा बंदरातून (मुंबई) सुरू होतो.पर्शियन आखातातली चाबहार आणि अब्बास या इराणी बंदरांशी तो पोचतो. पैकी चाबहार बंदरामुळे अफगाण भूमीवर व मध्य आशियात प्रवेश करू शकतो; तर अब्बास बंदराचा निरोप घेऊन इराणमधल्या भूमार्गाने वा रेल्वेमार्गाने इराणच्या कॅस्पियन सागरातल्या बंदरे-अंजलीपर्यंत आपण प्रवास केला तर कॅस्पियन सागरातून थेट रशियापर्यंत मजल मारणे शक्य होते. मुंबई बंदर जगात दक्षिणेला, तर कॅस्पियन सागरातले रशियन बंदर जगाच्या उत्तरेला आहे. आपली तटस्थता कैक मैत्रीचे पूल बांधू शकते, यात शंका नाही.

## राज्यातील प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचे गुरूवारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन –मंत्री मंगलप्रभात लोढा

**मुंबई** –'प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र'ही संकल्पना राज्यातील तरुणांच्या रोजगार संधीसाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते गुरुवारी १९ ऑक्टोबर २०२३ रोजी महाराष्ट्रातील ५०० ग्रामपंचातींमध्ये सुरु करण्यात येणार आहेत अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

मंत्रालय येथील मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर कक्ष येथे आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री श्री.लोढा बोलत होते. यावेळी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय चे संचालक दिगंबर दळवी उपस्थित होते.मंत्री श्री लोढा म्हणाले की, महाराष्ट्रातील २८ हजार ग्रामपंचायतींमध्ये आजवर एकही कौशल्य विकास केंद्र नव्हते. कौशल्य विकास हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे, त्या अनुषंगाने मनानीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार आम्ही ५०० ग्रामपंचातींमध्ये कौशल्य विकास केंद्रे सुरु करण्याचा निर्णय घेतला. माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली हा प्रकल्प पूर्ण झाला असून येत्या १९ ऑक्टोबर रोजी प्रधानमंत्री यांच्या हस्ते त्याचे उदघाटन होणार आहे याचा अभिमान वाटतो असे कॅबिनेटमंत्री लोढा यांनी सांगितले. रोजगारासाठी तरुणांचे



गावातून शहरात स्थलांतर होऊ नये त्या दृष्टीने हा कौशल्य केंद्राची ही संकल्पना महत्वाची असून भविष्यात राज्यातील या केंद्राची संख्याही वाढवण्यात येईल. हा कार्यक्रम राज्यस्तरावर होणार असल्याने कौशल्य विकास, उद्योग यांच्याबरोबरच महसूल, ग्रामविकास यांच्यासह आपल्या महिला व बालविकास विभागांचा या मध्ये सहभाग असणार आहे. पुढे जाऊन या केंद्राच्या संख्येत वाढ करण्यात येणार आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात ज्या- ज्या गावात हे केंद्र सुरु होणार आहे. त्याच्या आजुबाजूच्या गावातील नागरिक, लोकप्रतिनिधी आणि विविध घटक यांचा कार्यक्रमात सहभाग वाढावा यासाठीचे नियोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक गावात उद्घाटन सोहळ्याच्या ठिकाणी मैदान असेल तर मंडपाची उभारणी, पिण्याच्या पाण्याचे नियोजन, इंटरनेटची सुविधा, स्क्रीनची उभारणी, वीज पुरवठा या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्रामपंचायत सदस्यांपासून ते जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, आमदार, खासदार यांच्यासह आशा व अंगणवाडी सेविका आदीं या कौशल्य विकास केंद्राच्या उद्घाटनात आपला सहभाग नोंदवतील. विश्वकर्मा योजनेशी संबंधित लाभार्थी आणि अशा बलुतेदार घटकांनाही या कार्यक्रमात सहभागी करून घेण्याचे प्रशासनाचे प्रयत्न आहेत.

## अमितभाई, देशातील पहिले एम्स नेहरुंनी १९५३ साली सुरु केले – अतुल लोंढे

**मुंबई** –भारतीय जनता पक्षाचे नेते खोटे बोलण्यात पटाईत आहे. भाजपाचे सर्वोच्च नेते नरेंद्र मोदी व अमित शहा धादांत खोटे बोलतात व तोंडावर आपटतात. छत्तिसगडमधील एका सभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देशात मोदी सरकारच्या आधी एकही एम्स नव्हते अशी थाप मारली पण अमित शहा यांना माहित नसावे की पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी देशातील पहिले एम्स दिल्लीत १९५३ साली सुरु केले व आजही ते पहिल्या नंबरवर आहे, असे प्रत्युत्तर देत अमित शहांना प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी उघडे पाडले.



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजपाचा खोटेपणा उघड करताना अतुल लोंढे यांनी देशातील एम्सची यादीच वाचून दाखवली. दिल्लीतील एम्सनंतर जोधपूर, भुवनेश्वर, ऋषीकेश, पटणा, भोपाळ, रायपूर आणि रायबरेली येथे एम्स उघडण्यात आली आहेत. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाची २०१४ साली दिल्लीत सत्ता येण्याआधीच या एम्सची उभारणी करण्यात आलेली आहे. एम्सबरोबरच, आयआयएम, डीआरडीओ, आयआयटी या संस्थांचा पायाही पंडित जवाहरलाल नेहरु यांनीच घातला व त्यावर देश उभा राहिला. निवडणुकीच्या प्रचारात बिनधास्त खोटे बोलून लोकांची दिशाभूल करण्याचा मोदी-शहा प्रयत्न करत असतात पण जनता डोळे झाकून त्यांच्यावर विश्वास ठेवत नाही. बिहारमध्ये एम्स सुरु केल्याची बतावणी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केली होती तसेच केरळातही एम्स सुरु केल्याचे सांगितले पण दोन्ही ठिकाणच्या लोकांनी शहानिशा करुन मोदींच्या दाव्यातील हवा काढली. खोटं बोल पण रेटून बोल तसेच जुमलेबाजी करणे याशिवाय मोदी-शहांना काहीच येत नाही, असा टोलाही लोंढे यांनी लगावला.

## मनसे पदवीधर, शिक्षक मतदारसंघाची निवडणूक लढवणार:राज ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई, कोकण पदवीधर शिक्षक मतदार संघाचा मनसेकडून आढावा घेतला जात आहे. त्यामुळे आगामी पदवीधर, शिक्षक मतदारसंघात मनसे उमेदवार देणार असल्याची घोषणा मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी केली आहे.दरम्यान राज ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, राज्यात अर्धा पक्ष बाहेर, अर्धा पक्ष सत्तेत अशी महाराष्ट्रातील राजकारणाची परिस्थिती आहे. पण राज्यात असं राजकारण कधीच नव्हतं, असेही ते म्हणाले. चिपळूणमधील १४० कोटींचा उड्डाणपूल अचानक कोसळला. करोडो रूपये वाया गेले. रस्त्यावर लोकांचे जीव जातात पण याचे कोणालाही काही वाटत नाही. पण संबंधित मंत्री, नेत्यांचा कोणीही राजीनामा मागत नाही. त्यामुळे वेळ आल्यास मनसेच्या इंजिनमधून वाफ बाहेर काढणार. इंजिनचे चटके सत्ताधाऱ्यांना बसलतील, असा इशारा त्यांनी दिला आहे.राज ठाकरे म्हणाले की, गणेशोत्सवादरम्यान गोवा-मुंबई महामार्गाची एक लेन सुरू करणार बोलले होते, त्याचे काय झाले?, असा सवाल त्यांनी केला आहे.



तर राज्यात प्रत्येक टोलनाक्यावर मनसेची नजर, प्रत्येक टोलनाक्यावर ९० कॅमेरे लावावेत अशी मागणी देखील राज ठाकरे यांनी मनसेच्या बैठकीदरम्यान बोलताना सरकारकडे केली असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.अभिजीत पानसे म्हणाले की, राज्यात सुरू असलेल्या राजकीय उलथापालथीवर बोलताना अभिजीत पानसे यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. यावेळी बोलताना त्यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांना राज्याचे मुख्यमंत्री झालेले पाहायचे आहे, असे म्हणतानाच त्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन केले आहे. यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चांना उधान आले आहे.

## मुंबईकरांना प्रदूषणापासून मिळणार काहीसा दिलासा:कचऱ्यापासून होणार ६ मेगावॅट वीजनिर्मिती

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईकरांना लवकरच प्रदूषणापासून काहीसा प्रमाणात दिलासा मिळणार आहे. कारण देवनार डम्पिंग ग्राऊंडमधील कचऱ्यापासून ताशी ६ मेगावॅट वीज निर्मितीचा प्रकल्प येत्या १८ मिनिटांत पूर्ण होण्याची शक्यता आहे.नेस्को (गोरेगाव) मैदानावर सुरू असलेल्या प्रदर्शनात ही माहिती देताना री-सस्टेनेबिलिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) मसूद मलिक म्हणाले की, देवनार डम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यापासून ६ मेगावॅट वीजनिर्मिती करण्याबरोबरच राखेपासून इतर उपपदार्थांचीही तयार करण्यात येणार आहेत. त्यांनी सांगितले की त्यांची कंपनी मध्य प्रदेशातील रीवा, छत्तीसगढचे रायगुर, यूपीचे नोएडा आणि तेलंगणातील हैदराबाद येथे कचऱ्यापासून इतर वस्तूंची यशस्वीपणे निर्मिती करत आहे.एका प्रश्नाच्या उत्तरात री-सस्टेनेबिलिटीचे सीईओ मसूद मलिक म्हणाले की, मुंबईप्रमाणेच त्यांची कंपनी संभाजीनगर, नाशिक, पुणे यासह महाराष्ट्रातील इतर मोठ्या शहरांमध्ये कचऱ्यापासून वीज निर्मितीचे प्रकल्प उभारण्यास इच्छूक आहे. ते पुढे म्हणाले की, देवनार डम्पिंग ग्राऊंडवर कचऱ्यापासून वीज निर्मितीचा प्रकल्प यशस्वी झाल्यास भविष्यात २४ मेगावॅटपर्यंत वीजनिर्मिती करण्यासाठी मंजुरी मागितली जाईल. मुंबईत दररोज सुमारे ७ ते ८ हजार टन कचरा निर्माण होतो. यातील सुमारे ६०० टन कचरा दररोज देवनार डम्पिंग ग्राऊंडवर टाकला जातो. विशेष म्हणजे, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS) आणि एनजीओ अपनालय यांच्या अहवालानुसार, प्रदूषण आणि इतर कारणांमुळे देवनार डम्पिंग ग्राउंडच्या आसपासच्या लोकांचे आयुर्मान महाराष्ट्रातील इतर शहरांपेक्षा कमी आहे. राज्यातील शहरी भागातील लोकांची वयोमर्यादा सुमारे ७३.५ आहे तर देवनार डम्पिंग ग्राऊंड संकुलात राहणाऱ्या लोकांची वयोमर्यादा ३९ आहे.

## विद्यार्थ्यांना मिळणार शैक्षणिक मोफत दाखले

### माजी जी.प.सदस्य बोडलावारांचा पुढाकार



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवर असलेला गोंडपिपरी तालुका क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा आहे.तालुक्यात ९८ गावांचा समावेश आहे.गावातील नागरिकांना शासन प्रशासनाकडून वेळेवर कामे होणे अपेक्षित असते.मात्र,येथील अनेक विभागाचा कारभार पूर्णपणे प्रभारी अधिकाऱ्यांच्या खांद्यावर आहे.आठवड्यातून दोन दिवस अधिकारी गोंडपिपरी असतात.अशावेळी प्रशासनाचा कारभार प्रभारीच्या भरवशावर असल्याने त्यांना मोठी अडचण होत असते.विद्यार्थी व नागरिकांची अडचण लक्षात घेता श्रीसंत कोंडय्या महाराज संस्थानचे अध्यक्ष तथा माजी जी प सदस्य अमर बोडलावार यांनी विद्यार्थ्यांना मोफत व तातडीने दाखले देण्याचा उपक्रम सुरू केला आहे.गोंडपिपरी येथील धाबा मार्गावरील वांशिका मेडिकल मध्ये हा उपक्रम सुरू करण्यात आला.जातीचे दाखले,अधिवास प्रमाणपत्र,नॉनक्रिमिलियर हे दाखले पूर्णपणे मोफत देण्यात येणार आहे.२४ ऑक्टोबर पर्यंत हा उपक्रम सुरू राहणार आहे

## पिजदुरा येथे कृषीदुतांनी दिले गुटी कलम निर्मितीवर प्रशिक्षण

**वरोरा । प्रतिनिधी**

ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत महारोगी सेवा समिती द्वारा संचालित, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाशी संलग्नित वरोरा येथील आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पिजदुरा येथे शेतकऱ्यांना गुटी कलम निर्मितीवर प्रशिक्षण दिले.

फळबाग उत्पादन हा दीर्घकाळ व्यवसाय असल्याने जातीवंत व दर्जेदार कलम निवड अत्यंत महत्त्वाची असते. जातीवंत कलम निर्मितीसाठी मातृवृक्षाच्या पक्क फांदीवर दोन डोळ्यांच्या मध्ये २ ते ३ सें. मी. रुंदीची गोलाकार साल काढावी. ओलसर शेवाळ (स्पॅगनम मॉंस) घट्ट गुंडाळावे. यावरती १२-१२ सें.मी. आकाराच्या २०० गेज जाळीच्या पॉलीथीन कागद सुतळीच्या साहाय्याने घट्ट बांधावा. गुटी कलमे बांधल्यानंतर ४ ते ५




आठवड्यांनी मुळ्या येण्यास सुरुवात होते. ६० दिवसांनी मुळांचा रंग तांबडा झाल्यावर गुटीच्या खालच्या बाजुने सिकेटरच्या सहाय्याने काप दयावा. कलमे मातृवृक्षापासून वेगळी करावी. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पोतदार, कार्यक्रम प्रभारी डॉ. आर. वी. महाजन, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एन. पंचभाई व विषय विशेषज्ञ डॉ. अनिल भोगावे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमात हर्षल लोथे, ज्ञानेश्वर तायडे, शुभम गुंजाळ, स्वरांशु मून, हिमांशू सोनटक्के व भवानी प्रसाद या विद्यार्थ्यांचा व गावकऱ्यांचा समावेश होता.

## कृषी दूताचे बीज प्रक्रियेबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**वरोरा । प्रतिनिधी**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ संलग्नित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा येथील कृषिदुतांनी बीज प्रक्रिया बद्दल महत्त्व पटवून दिले.

रबी लागवडीला सुरुवात झाली असून, बरेच शेतकरी बीज प्रक्रिया करीत नाहीत.बीज प्रक्रिया केल्यामुळे खूप फायदे होतात. कंपनी कडून आलेल्या बियाण्याला गौचो सारख्या औषधांची बीजप्रक्रिया केलेली असते आपण ते बियाणे लागवड करतो. आपल्या पिकावर कमी रोग पडावेत, तसेच नत्र, स्फुरद, पालाश स्थिरीकरण व विरघडवण्यासाठी विविध प्रकारच्या जिवाणू खतांची प्रक्रिया करावी.त्यात ऍझोटोबॅक्टर,रायझोबियम, पीएसबी, विविध प्रकारची बुरशी नाशके यांची बीज प्रक्रिया केल्यामुळे काय फायदे होतात व कोणत्या कोणत्या जिवाणूंची व कशी कोणत्या क्रमाने बीजप्रक्रिया करावी या विषयीची माहिती आपण आज पाहू. शेतकरी बंधूनी शेती



करताना शेतीचे सर्व प्रकारचे व्यवस्थापन , नियोजन अत्यंत काटेकोर पणे केले पाहिजे. शेती व्यवसायात बियाण्याला असाधारण महत्त्व आहे. या उपक्रमात कृषिदूत यश आत्राम , पृथ्वीराज चव्हाण, आदित्य जलमकर, अमन राठोड , अनिकेत तागडे, आदित्य मंगर यांनी प्रात्यक्षिकात सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. सुहास पोतदार, डॉ. आर. वी. महाजन, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एन. पंचभाई, डॉ. आश्विनी मानकर, डॉ. प्रदीप अकोटकर यांचे मार्गदर्शन कृषिदूतांना लाभले.

## भगवानपूरचे आदर्श पुनर्वसन करणार : पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भगवानपूर या नावातच देवाचे वास्तव्य आहे. त्यामुळे येथील लोकांना उत्कृष्ट दर्जाच्या मुलभूत सोयीसुविधा देणे, हे आपले पहिले कर्तव्य आहे. या गोष्टीची सर्व संबंधित अधिका-यांनी जाणीव ठेवावी. गावात शबरी आदिवासी योजनेतून १०० टक्के घर, शेतीला कुंपण, पिण्याचे शुध्द पाणी, रस्ते, नाल्या अशा अनेक बाबींमध्ये भगवानपूरचे आदर्श पुनर्वसन करणार असल्याची ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

नियोजन सभागृह येथे भगवानपूर (ता.मूल) येथील शबरी आदिवासी घरकुल योजनेचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., उपवनसंरक्षक कुशाग्र पाठक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुभाष पवार, राहुल पावडे, संध्या गुरुनुले, भगवानपूरचे सरपंच सचिन गरमडे आदी उपस्थित होते.भगवानपूर येथील नागरिकांना शबरी आदिवासी घरकुल योजनेतून घर देण्यासाठी अतिशय सुक्ष्म नियोजन करून प्रस्ताव पाठवा, असे सांगून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, प्रस्तावासोबत विस्तृत टिपण, लाभार्थ्याचा घरासमोरील फोटो, आवश्यक असल्यास क्यूआर कोड आदी



बाबींचा उल्लेख करावा. विशेष बाब म्हणून भगवानपूर येथील नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ द्यायचा आहे, त्यामुळे प्रस्ताव परिपूर्ण असायला हवा. घरकुल योजनेसाठी लागणा-या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. तसेच ज्या लाभार्थ्यांकडे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र नाही, अशा लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठीसुध्दा शिबिरांचे आयोजन करावे.शेतक-यांना शेतापर्यंत ये-जा करण्यासाठी बारमाही रस्ते उपलब्ध करणे, तसेच त्यांच्या शेतावर कृषी बी-बियाणे, अवजारे व शेतातील इतर साहित्य वाहून नेण्याची सोय व्हावी म्हणून जिल्ह्यात मातोश्री पाणंद रस्ते योजनेंतर्गत ५००० कि.मी. चे रस्ते पूर्ण करण्याचे नियोजन आहे. याबाबत पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नुकताच आढावा घेतला. यावेळी बोलतांना पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाणंद रस्ते हा अतिशय महत्वाचा व जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे केवळ उद्दिष्टपुर्ती म्हणून नव्हे तर अभियान म्हणून या विषयाकडे लक्ष द्यावे. याबाबत जिल्हा परिषदेने विस्तृत नियोजन करावे. नागरिकांच्या शंकांचे समाधान करण्यासाठी ग्रामसेवक व सरपंचांची परिषद घ्यावी. तसेच संबंधित कर्मचा-यांची कार्यशाळा घेऊन त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. पाणंद रस्त्याच्या योग्य अंमलबजावणीकरीता आवश्यकता असल्यास नवीन कर्मचा-यांची नियुक्ती करावी. पंचायत समिती स्तरावर यासाठी समिती नेमून तक्रारींचे समाधान करण्यासाठी पोर्टल तयार करावे. यात रस्त्याची गुणवत्ता, लागणा-या साहित्याचा दर्जा अशाप्रकारच्या तक्रारी नोंदविता नागरिकांना नोंदविता आल्या पाहिजे. पाणंद रस्ता करतांना त्यासाठी किती निधीची तरतूद केली, किती कि.मी.चा रस्ता, कधी पूर्ण होणार, कंत्राटदार कोण आहे, यासंबंधिचा फलक लावावा. तसेच अतिक्रमण असलेल्या रस्त्याची मोजणीची व्यवस्था संबंधित विभागाने त्वरीत करावी. पहिल्या टप्प्यात ५००० कि.मी. रस्त्याचे किमान खडीकरण व्हावे, अशी अपेक्षासुध्दा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी सादरीकरण केले. बैठकीला विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**वेगवेगळ्या स्त्रोतांमधून निधी उभारणार :** जिल्ह्यातील पाणंद रस्त्यासाठी किमान २०० ते २५० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. त्यासाठी विशेष बाब म्हणून २५:१५ मधून, मनरेगा, रोहयो, मानवविकास, आदिवासी विकास विभाग, जिल्हा नियोजन समिती, खनीज विकास निधी आदी स्त्रोतांमधून निधी उभारणार असल्याचे पालकमंत्री मुनगंटीवार यांनी सांगितले.

**अधिकाऱ्यांनी करावी पाहणी :** पुनर्वसित असलेल्या भगवानपूरमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी, रस्ते नाल्यांची व्यवस्था पाहणीसाठी जिल्हाधिका-यांसह मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य वनसंरक्षक, उपवनसंरक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी. तसेच स्थानिक नागरिकांना रोजगार देण्यासंदर्भात वन विभागाने पुढाकार घ्यावा, अशा सुचनाही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.

# वर्धा जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी प्रयत्न करणार-ना.मुनगंटीवार

## ना.मुनगंटीवार यांच्या हस्ते नामवंत खेळाडूंचा सत्कार







**वर्धा । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याची क्षमता वर्धा जिल्ह्यामध्ये आहे. त्यासाठी उत्तम दर्जाच्या सोयीसुविधा खेळाडूंना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या सुविधा निर्माण करण्यासाठी नक्कीच प्रयत्न केले जातील. राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे केवळ तीनच सिंथेटिक स्मार्ट ट्रॅक आहेत. हे तिन्ही ट्रॅक चंद्रपूर जिल्ह्यात आहेत. आता त्याच धर्तीवर वर्धा जिल्ह्यात ट्रॅक तयार करण्यात येतील, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिला.

विकास भवन येथे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने नामवंत खेळाडूंच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला खासदार रामदास तडस, आमदार डॉ.पंकज भोयर, आमदार समीर कुणावार, उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी सुमित वानखडे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सुनील गफाट, माजी खासदार सुरेश वाघमारे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष वैशाली येरावार, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड आदी उपस्थित होते.जिल्ह्यातील प्रत्येक खेळाडूने त्या आवडीच्या क्रीडा प्रकारात नावलौकिक मिळविला पाहिजे. त्यादृष्टीने त्यांना आवश्यक सोयीसुविधा देण्याकरीता शासन त्यांच्या पाठीशी आहे, असेही ना. मुनगंटीवार म्हणाले.सरकारच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या योजनांबद्दल सांगताना ते म्हणाले, 'तरुणांसाठी रोजगाराच्या योजनांसह शेतकऱ्यांसाठी सुद्धा विविध योजना राबविल्या जात आहेत. माझी कन्या भाग्यश्री, निराधार योजनेच्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे. गोरगरिबांना घरकुल उपलब्ध व्हावे यासाठी ओबीसी घटकाकरिता घरकुल योजना सुरु करण्यात आली आहे.' भारत पाकिस्तान सिमेवर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार असून महाराजांची वाघनखे लंडनवरुन आणण्यात येत असल्याचे ना. मुनगंटीवार म्हणाले.यावेळी खासदार रामदास तडस यांनीही विचार मांडले. ते म्हणाले, 'खेळाडूंना शासकीय नोकरीमध्ये संधी देण्याचे काम राज्य शासन करीत आहे. नोकरीमध्ये संधी दिल्यानंतर या नामवंत खेळाडूंना आशियाई व ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये नशीब आजमावण्यासाठी किमान तीन वर्षे संधी मिळणे आवश्यक आहे. जिल्ह्यात कुस्ती प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रामुळे राज्यातील कुस्तीपटूंना मोठा लाभ मिळणार आहे.'

**प्रतिभावंतांचा गौरव**

**यावेळी ना. मुनगंटीवार यांच्या हस्ते आशियाई क्रीडा स्पर्धेत २० वर्षाखालील क्रिकेटमध्ये भारतीय संघाचे तसेच आयपीएलमध्ये हैदराबाद संघाचे प्रतिनिधीत्व करणारा क्रिकेटपटू सौरभ दुबे, स्वीडन येथे झालेल्या हॅन्डबॉल खेळामध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करणारा अनुज मोहन ठाकरे, वेदांत दिगांबर घोडमारे, रायफल शुटींगमध्ये राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण पदक प्राप्त करणारा प्रथमेश विजय मेढेवार, क्रीडा क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणाऱ्या महिला पोलिस सुनयना डोंगरे व इटली, रशिया, नेपाळ येथे जलतरण स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करुन देशाचे नाव उज्वल करणारे आंतरराष्ट्रीय वयोवृध्द खेळाडू गिरीष उपाध्याय यांचा सत्कार करण्यात आला.**

**सेवाग्राम शब्दातच सेवा!**

**महात्मा गांधी यांची पावनभूमी असलेल्या सेवाग्राम या नावातच 'सेवा' शब्द आहे. त्यामुळे येथील नागरिकांसाठी सेवा भावना जोपासत येथील जनता हीच आपला परिवार आहे, हे मानून त्यांच्या कल्याणासाठी येत्या काळात कामे केली जातील,' अशी ग्वाही पालकमंत्री ना. मुनगंटीवार यांनी दिली**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार डॉ. भोयर यांनी केले. वर्धेतील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळविणे ही अभिमानाची बाब आहे. तालुकास्तरावर क्रीडा संकुल तयार केल्यामुळे जिल्ह्यात आंतराष्ट्रीय खेळाडू तयार होण्यास मदत होईल, असा विश्वास आमदार भोयर यांनी व्यक्त केला.

# बारा बलुतेदारांना कंपनीच्या कंत्राटामध्ये सामावून घ्या-डॉ.अंकुश आगलावे

**भद्रावती । प्रतिनिधी**



बारा बलुतेदारांना कंपनीच्या कंत्राटमध्ये सामावून घेण्याची मागणी विदर्भ प्रदेश अध्यक्ष केंद्रीय मानवाधिकार संगठन, नवी दिल्ली चे डॉ. अंकुश आगलावे यांनी भद्रावती तालुक्यातील अरविंदो रियालिटी ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेंट लिमिटेड कंपनीसंबधी बैठक दरम्यान राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांना केली.

या प्रकल्पात बेलोरा, टाकळी, डोंगरगांव, घोटाळा, जेना, निवली, किलोणी व सोमनाळा गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत आहे. यावेळी हंसराज अहीर व गावातील शेतकरी बांधवांची चर्चा झाली. यावेळी सर्व प्रकल्पग्रस्त व शेतकरी बांधवाना कंपनी व जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून योग्य भाव व रोजगार मिळवून देण्याचे आश्वासन अहीर यांनी दिले. डॉ. आगलावे यांनी मागणी केली की, जमिनीचा भाव हा वेकोलिच्या धरतीवर देण्यात यावा तसेच आर.आर. पॉलीसी नुसार दहा लाख रूपये व दोन एकरास नोकरी देण्यात यावी. नागरी सुविधा, पीएपी प्रमाणपत्र, रोजगार, पुनर्वसन, बारा बलुतेदारांना कंपनीच्या कंत्राटीत समावेश तसेच वेकोलि व खाजगी कंपनीच्या अनुदानामध्ये किती तफावत असते हे शेतकऱ्यांना समजावून सांगितले. डॉ. आगलावे यांनी शेतकऱ्यांना जमीनीचा योग्य भाव मिळण्याकरीता अनेक वेळा शासनदरबारी निवेदन दिले तसेच पुनःजनसुनावणी प्रशासनाने घ्यावी अशी मागणी अनेकदा निवेदनातुन केली आहे.यावेळी मंचावर नरेंद्र जीवतोडे, रमेश राजुरकर, धनंजय पिंपळशेंडे, प्रशांत डाखरे, इमरान भाई , आकाश वानखेडे, तसेच सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील , गावकरी व प्रकल्पग्रस्त मोठया संख्येने उपस्थित होते.

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे लायसन्स कॅम्प आयोजित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे चंद्रपूर जिल्ह्यांतर्गत लायसन्स कॅम्प आयोजित करण्यात येत आहे. सदर कॅम्पमध्ये शिकाऊ अनुज्ञप्ती व पक्के अनुज्ञप्ती पूर्वनियोजित ऑनलाइन अपॉइंटमेंट नुसार देण्यात येणार आहेत. तरी, जिल्ह्यातील नागरिकांनी उपलब्ध संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांनी केले आहे.


दि. २३ ऑक्टोबर २०२३ रोजी आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन वरोरा, २६ ऑक्टोबर रोजी एन. एच. महाविद्यालय ब्रह्मपुरी, २७ ऑक्टोबर रोजी रोजी शरद पवार महाविद्यालय, गडचांदूर, ३० ऑक्टोबर रोजी शासकीय विश्रामगृह चिमूर आणि ३१ ऑक्टोबर रोजी शासकीय विश्रामगृह,गोंडपिपरी या ठिकाणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच प्रत्येक महिन्याला दुपारी १ वाजता शिबिराचे ऑनलाईन अपॉइंटमेंट कार्यालयामार्फत खुले करण्यात येईल याची जिल्ह्यातील नागरीकांनी नोंद घ्यावी.

## दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या स्वप्न पूर्तीसाठी प्रतिभाताईसोबत राहा-माजी खासदार नरेशबाबू पुगलिया

### भाऊचा दांडियासाठी पुगलिया कुटुंबियांकडून दीड लाखांची बक्षिसे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या जाण्याने एक सहकारी मी गमावला आहे. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कार्यकर्त्यांनी आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्यासोबत राहण्याचे आवाहन खासदार नरेशबाबू पुगलीया यांनी केले. चंद्रपूर शहरातील भाऊचा दांडिया उत्सवाचे उद्धघाटन माजी खासदार नरेशबाबू पुगलिया यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी माजी खासदार नरेशबाबू पुगलिया सपत्नीक आले होते. दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या उपस्थितीत मागील वर्षी भाऊचा दांडिया उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु त्यांच्या जाण्याने या उत्सवाचं आयोजन करण्याची जबाबदारी त्यांच्या पत्नी आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्यावर आली. यावेळी त्यांनी पुगलिया कुटुंबियांकडून दांडियातील स्पर्धकांकरिता दीड लाखांची बक्षिसे जाहीर केली. ग्रुप दांडियामध्ये नगरपरिषद चंद्रपूर निर्वाचित प्रथम अध्यक्ष स्व. राजमलजी पुगलिया यांच्या स्मुर्तीप्रित्यर्थ राजमलजी पुगलिया फाऊंडेशन, चंद्रपूर तर्फे एक लाख चे प्रथम पुरस्कार व कपल डॉन्स मध्ये ज्या ग्रुपचा प्रथम क्रमांक येईल त्या कपल गृपला स्वतंत्र सेनानी स्व. उत्तमचंद राजमलजी पुगलिया यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ५० हजार रुपयाचे पारितोषिक देण्यात येणार आहे. याप्रसंगी आमदार प्रतिभाताई धानोरकर म्हणाल्या कि, दिवंगत बाळूभाऊ धानोरकर यांच्या जाण्याने न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. परंतु त्यांची क्रीडा, सांस्कृतिक व इतर क्षेत्रात आवड



होती. तो वसा पुढे नेण्याकरिता मी पुढे देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. यावेळी चंद्रपूर शहर जिल्हाध्यक्ष रामू तिवारी, भद्रावती नगराध्यक्ष अनिल धानोरकर, कॉंग्रेस जेष्ठ नेते विनोद दत्तात्रय, यवतमाळ मध्यवर्ती बँकेचे माजी अध्यक्ष टिकाराम कोंगरे, कॉंग्रेस नेते गजानन गावंडे, सेवादल जिल्हाध्यक्ष सूर्यकांत खनके, इंटक नेते के. के. सिंग, ओबीसी जिल्हाध्यक्ष प्रशांत दानव, माजी महापौर संगीताताई अमृतकर, शहर महिला कॉंग्रेस अध्यक्ष चंदाताई वैरागडे, अनुसूचित जाती महिला नेत्या अश्विनीताई खोब्रागडे, अल्पसंख्याक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष सोहेल शेख रजा, इंटक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष प्रशांत भारती, वरोरा शहर अध्यक्ष विलास टिपले, भद्रावती शहर अध्यक्ष सुरज गावंडे, वरोरा तालुका अध्यक्ष प्रशांत काळे, माजी नगरसेवक अशोक नागापुरे, माजी नगरसेवक देवेंद्र बेले, यवतमाळ महिला जिल्हाध्यक्ष वंदनाताई आवारी, वसंत जिनींग संचालिका साधनाताई गोहोकार, शारदाताई ठाकरे, संध्याताई गोहोकर, माजी नगरसेवक प्रसन्न सिरवार, माजी नगरसेवक गोपाल अमृतकर, भालचंद्र दानव, रतन शिलावार, नरेंद्र बोबडे, डॉ. सागर वझे, उमाकांत धांडे, सुरजकुमार बोबडे, मोनू चिमुरकर, सचिन घाटे, प्रमोद मगरे, बसंत सिंग, बाळू चिंचोलकर, सुनंदा धोबे, मीनाक्षी गुजरकर, शालिनी भगत, सौरभ ठोंबरे, मोनू रामटेके यांची उपस्थिती होती. 'भाऊचा दांडिया' उत्सवानिमित्त आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी स्पर्धकांना मिळणार आहे. त्यात दोन चॅम्पियन्स ला ई दुचाकी, व रोख बक्षिसे देण्यात येणार आहे. चांदा क्लब ग्राउंडवर २४ ऑगस्ट २०२२ रोजीपर्यंत सायंकाळी सहा ते रात्रौ १० वाजता दांडियाची घूम राहणार आहे. यात दररोज वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत सहभागी होणार आहेत. या महोत्सवात उपस्थित राहण्याचे आवाहन दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ द मराठा चॅरिटेबल स्ट्रट तथा बाळूभाऊ धानोरकर मित्र परिवार चॅरिटेबल सोसायटी च्या वतीने करण्यात आले आहे.


# सरकारने जाहीर केलेले ओबीसी संघटनांसोबतच्या चर्चेचे इतिवृत्त स्वागतार्ह-डॉ.अशोक जीवतोडे

## मुंबईत झाली होती बैठक : संघटनांच्या १५ मागण्यांवर सरकारने दिलेली आश्वासनांचा समावेश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मराठा समाजाला सरसकट कुणबी जातीची प्रमाणपत्रे देऊन ओबीसीत सामील करण्याच्या मागणीसाठी मराठा समाजाकडून तर दुसरीकडे या मागणीच्या विरोधासाठी ओबीसींकडून आंदोलन सुरू असताना राज्य सरकारने २९ सप्टेंबर रोजी मुंबईत राज्यातील ओबीसी संघटनांची बैठक घेतली होती. या बैठकीचे इतिवृत्त मंगळवारी (दि. १७) जाहीर झाले. त्यात ओबीसी संघटनांच्या १५ मागण्यांवर सरकारकडून कोणती आश्वासने दिली, याचा तपशील आता उघड झाला आहे, हे इतिवृत्त स्वागतार्ह आहे, अशी माहिती राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे समन्वयक डॉ. अशोक जीवतोडे यांनी म्हटले आहे.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे उपोषण केले होते. राज्य सरकारने आश्वासने देऊन हे उपोषण सोडले. दरम्यान, चंद्रपूरचे ओबीसी कार्यकर्ते रवींद्र टोंगे यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याला विरोध करून अन्नत्याग आंदोलन सुरू केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टोंगे यांची भेट घेतल्यानंतर अन्नत्याग आंदोलनाची सांगता झाली. त्यानंतर राज्यातील ओबीसी संघटनांशी चर्चा करण्यासाठी २९ सप्टेंबर २०२३ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उपमुख्यमंत्री (गृह) देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री (वित्त) अजित पवार यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली.



ओबीसी संघटनांनी केलेल्या मागण्यांवर मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशांचा संपूर्ण इतिवृत्तच मंगळवारी जाहीर करण्यात आला आहे.ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देताना जुन्या नोंदी तपासून जात प्रमाणपत्र देण्यात येईल. ओबीसी जातनिहाय सर्वेक्षणास सरकार अनुकूल असून बिहारच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणार, देशातील ओबीसी जनगणनेसाठी विधीमंडळाचा ठराव महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्तांकडे सादर होईल, ७२ वसतिगृहे सुरू करणार, व्यावसायिक शब्द वगळण्यात येईल. वसतिगृहात प्रवेश नसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आधार योजना लागू करण्याबाबत तपासणी करणार, बीसीए, एमसीएम अभ्यासक्रमाचे मॅपिंग करून शिष्यवृत्ती व फ्रिशिप लागू करू, ओबीसी संवर्गातील योजना लाभासाठी केंद्र शासनाने नॉन क्रिमिलेअर अट ठेवलेल्या योजनांची स्वतंत्र उत्पन्न मर्यादा न ठेवता केवळ नॉन क्रिमिलेअर अट ठेवण्यात येईल. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ धर्तीवर कर्ज धोरण आखण्यात येईल. ओबीसी अधिकारी व कर्मचारी संख्या तपासणीसाठी राज्य मागासवर्गीय आयोगाला कळविण्यात येईल. केंद्राच्या विश्वकर्मा योजनेशी सांगड घालून योजना सुरू करू, महाज्योती, सारथी, टी. आर. टी. आय. योजनांसाठी समिती नेमण्यात येईल. अनुसूचित क्षेत्रातील १०० टक्के भरतीमधील ओबीसींवर झालेल्या अन्यायाबाबत तपासणी केली जाईल. विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल. महाज्योती संस्थेच्या इमारत बांधकामाबाबत निर्णय घेण्यात येईल, अशी आश्वासने राज्य सरकारने दिली आहेत, ती पूर्ण होतील अशी अपेक्षाही डॉ. अशोक जीवतोडे यांनी व्यक्त केली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .